डॉ. दत्तात्रय नानाराव काळे, वैद्यकीय अधिकारी,
<u>गट-अ यांच्या स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः मवैअ-१५१६/प्र.क्र. ८०१/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, संकुल इमारत, १० वा. मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १३ सप्टेंबर, २०१७

वाचा :- संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/२ब/टे-५/ स्वेसेनि - के १०/२ब/१३९८/१६, दि. १६/०९/२०१६.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, वैद्यकीय अधिकारी गट-अ या संवर्गातील (वेतन बँड रु. १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रु. ५४००) या मध्ये कार्यरत असलेले डॉ. दत्तात्रय नानाराव काळे, वैद्यकीय अधिकारी, गट-अ, ग्रामीण रुग्णालय, भोकर, जि. नांदेड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस होऊन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.३/४/२००२ अन्वये नामनिर्देशनाने नियुक्ती झाली आहे. तत्पुर्वी ते दि.२५.०१.१९९६ पासून अस्थायी वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांची दि. २५.०१.१९९६ ते दि. ०२.०४.२००२ पर्यंतची अस्थायी सेवा ही दि.१९.०८.२००७ च्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्ती विषयक लाभासाठी ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यानुसार ते शासन सेवेत दि.२५.०१.१९९६ रोजी रुजू झाल्यापासूनची त्यांची पुढील सेवा ही सेवानिवृत्तीसाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राह्य धरण्यात आली आहे. त्यानुसार डॉ. काळे, यांनी म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम क्र. ६६ (१) मधील तरतुदीनुसार २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण केलेली असल्याने, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (५) नुसार डॉ. काळे यांनी स्वेच्छा सेवानिवृत्तीची नोटीस विहित कालावधीत मागे न घेतल्याने, म.ना.से. (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६ (२) नुसार डॉ. काळे हे आपोआपच स्वेच्छा सेवानिवृत्तीच्या नोटीशीच्या समाप्तीच्या दिनांकास स्वेच्छा सेवानिवृत्त (Deemed to retire) झाले आहेत. सबब, डॉ. काळे यांनी दि. ०१/०४/२०१६ च्या अर्जान्वये दिलेली स्वेच्छा सेवानिवृत्तीची सूचना स्विकारण्यात आली असून, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ (१) (२) (५) मधील तरतुदींनुसार डॉ. दत्तात्रय नानाराव काळे, वैद्यकिय अधिकारी, गट-अ, हे दि.०१/०७/२०१६ (म.पू.) पासून स्वेच्छेने सेवानिवृत्त झाले असल्याचे घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201709121004556817 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c0ff0607bc973d9663171bd9b8a9b9ab8cb569b155f9653d1180a4549819299, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2017.09.14 14:50:17 +05'30'

(स.ह. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३) उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ लातूर.
४) वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, भोकर, जि. नांदेड .
५) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखारीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
६) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.
७) डॉ. दत्तात्रय नानाराव काळे, वैद्यकिय अधिकारी यांना
(उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ लातूर यांचे मार्फत
८) निवडनस्ती सेवा-३.